**म.शि.प्र.मंडळाचे,**

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

## राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम अहवाल

**२०१९-२०**

1. **योग दिन साजरा :**

दि. 21 जून, 2019 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने योग दिन साजरा करण्यात आला. या शिबीरास प्राचार्या वनमाला गुंडरे, उपप्राचार्य कांतराव गाडे, डॉ. दिनकर तांदळे, कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजित भगत, अनंत मरकाळे महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. या शिबीरास योग शिक्षक प्रा. तत्तापुरे जे. जी. यांचे मार्गदर्शन लाभले.

2. **सल्लागार समितीची बैठक :**

"राष्ट्रीय सेवा योजना" विभागाच्या सल्लागार समितीची बैठक प्राचार्य डॉ. व्ही.जी. गुंडरे यांच्या अध्यक्षतेखाली दि. 30.06.2019 रोजी घेण्यात आली. या बैठकीमध्ये "राष्ट्रीय सेवा योजना" यांच्या वतीने राबविण्यात येणाया वार्षिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

3. **स्वयंसेवक नोंदणी :**

दि. 12 जुलै 2019 रोजी "राष्ट्रीय सेवा योजना" मध्ये सहभागी होण्यासाठी महाविद्यालयामध्ये विद्यार्थीसाठी सूचना प्रदर्शित करण्यात आली व ईच्छुक विद्यार्थ्यांकडून अर्जाची मागणी केली. विद्यार्थ्यांकडुन आलेल्या अर्जांची छाननी करून 200 (दोन एकक) स्वंयसेवकांची निवड केली. सदरील यादी रा. से. यो. विभाग विद्यापीठाकडे स्वयंसेवक प्रवेश फी सह सादर केली आहे.

4. **व्यसनमुक्ती अभियान :**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. 11 जुलै 2019 रोजी व्यसनमुक्ती अभियानाअंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांना व्यसनापासुन दुर राहण्याची शपथ देण्यात आली. तसेच व्यसनामुळे होणाऱ्या रोगांविषयी माहिती देणारे पोस्टर प्रदर्शन करण्यात आले.

**5. 09 ऑगस्ट क्रांती दिन :**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शुक्रवार दि. 09 ऑगस्ट 2019 रोजी क्रांती दिनानिमित्त व्याख्यान व श्रमदान आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी महाविद्यालयाच्या प्राचार्या. डॉ. व्ही. जी. गुंडरे ह्या होत्या तर कर्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ. दिलीप भिसे हे उपस्थित होते. यावेळी विचारमंचावर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. आय. आर. भगत, प्रा. अनंत मरकाळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी व यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पुजन करुन करण्यात आली. त्यानंतर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. अनंत मरकाळे यांनी केले कार्यक्रमाची रुपरेषा सांगितली व क्रांती दिनाचे महत्व पटवून दिले. यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. दिलीप भिसे यांनी रा.से.यो. विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. त्याचबरोबर स्वयंसेवकांनी वर्षभर काय कार्य करायचे आहे त्याबाबत माहिती दिली. यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. व्ही. जी. गुंडरे यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना त्यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना त्यांनी विद्यार्थ्यांनी स्वयंशिस्तीने सामाजिक कार्यात सहभाग घ्यावा. विद्यार्थी ह्या देशाचा भावी नागरिक आहे. त्याने श्रमाचे महत्व जाणून श्रमदान करायला हवे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. इंद्रजित भगत यांनी करुन उपस्थितांचे आभार प्रा. राजाभाऊ भगत यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. संजय सुरेवाड, प्रा. दिलीप कांबळे, प्रा. क्षिरसागर तसेच सुरेश घाडगे, रामेश्वर सरवदे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर स्वयंसेवकांनी महाविद्यालयात श्रमदान करुन परिसर स्वच्छ केला.

**6. पुरग्रस्तांसाठी मदत फेरी :**

महापुरामुळे कोल्हापूर, सांगली जिल्हातील लोकांचे जनजीवन विस्कळीत झाले. हजारो कुटूंबे विस्कळीत झाली. अशा परीस्थितीत त्यांना मदतीची गरज आहे. या पार्श्वभूमिवर मानवतेच्या भावनेतून या पुरग्रस्तांसाठी प्राचार्य डॉ. वनमाला गुंडरे, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. 13.08.2019 रोजी शहरात मदत फेरी काढण्यात आली. या मदत फेरीचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. आय.आर. भगत, प्रा. अनंत मरकाळे यांनी केले होते. उपप्राचार्य के. डी.गाडे यांनी मार्गदर्शन केल्यानंतर स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी यशवंतराव चव्हाण चौक, मोंढा मार्केट, मिनाताई ठाकरे चौक, तथागत चौक, राजीव गांधी चौक या ठिकाणी फेरी काढून समाजातून रू. 18,560/– (अक्षरी : अठरा हजार पाचशे साठ रू.) एवढा निधी गोळा केला. त्याच वेळी समाजातील काही दानशुर लोकांनी चिवडा, बिस्टीक व कपडे दान केले. त्या वस्तु ॲड. सतोष पवार यांच्या **'आधार माणुस्कीचा'** या संस्थेच्या माध्यमातून कोल्हापूर व सांगली येथील पुरग्रस्त लोकांपर्यंत पाठविण्यात आल्या. या फेरीसाठी डॉ.

दिलीप भिसे, प्रा. देवकते, प्रा. करूणा सरवदे यांचे सहकार्य लाभले. या मदत फेरीत राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी उस्फुर्त सहभाग घेतला होता.

7. **वृक्षारोपण उपक्रम :**

दि. 19 ऑगस्ट 2019 रोजी वृक्षारोपन कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी एकूण 50 वृक्षांची लागवड महाविद्यालय परिसरात करण्यात आली. या उपक्रमात प्राचार्य. डॉ. व्ही. जी. गुंडरे, उपप्राचार्य. प्रा. के. डी. गाडे, कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजित भगत, डॉ. अनंत मरकाळे व रा.से.यो. विभागातील स्वयंसेकासमवेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचा—यांनी सहभाग नोंदविला.

8. **पोषण माह :**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 01 सप्टेंबर ते 30 सप्टेंबर 2019 या कालावधीत पोषण माह आयोजित केला आहे. यानिमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महिनाभर विविध कामाचे आयोजन करण्यात येणार आहे. याचाच एक भाग म्हणून दि. 04 सप्टेंबर 2019 रोजी पोषण आहार जागृती विषयक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे ह्या होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून स्मामी रामानंद तिर्थ वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. आर. टी. अंकुशे व प्रा. प्रशांत दहिरे हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजित भगत यांनी केले. त्यानंतर कोल्हापुर सांगली येथील पुरग्रस्तांना मदत निधी जमा करण्यात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल पुजा सापते या विद्यार्थीनीचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. अंकुशे म्हणाले की, मानवाच्या पोषणाची सुरुवात आईच्या गर्भात असल्यापासूनच होत असते म्हणून गरोदर महिलांनी समतोल आहार घेतला पाहिजे तसेच आईचे पहिले दुध नवजात शिशुला पाजले पाहिजे. ज्यामुळे बालकाची प्रतिकार क्षमता वाढण्यास मदत होते. दररोज आपण पाच वेगवेगळ्या रंगाचे पदार्थ खायला पाहिजेत ज्यामुळे आपल्या शरीराला सर्व प्रकारचे पोषण द्रव्य मिळण्यास मदत होईल.

यानंतर डॉ. प्रशांत दहिरे यांनी बदलत्या जीवन शैलीमुळे होणाऱ्या आजारांची माहिती दिली. त्यावेळी त्यांनी पोषणाच्या चार सुत्रांची माहिती दिली. भाजीपाला व भळे नैसर्गीक अवस्थेतच खाल्ले पाहिजे असे त्यांनी सांगीतले समतोल आहाराबरोबरच त्यांनी तान तणाव मुक्त दिनचर्या आरोग्यासाठी आवश्यक असल्याचे सांगितले. यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील शंका विचारल्या मार्गदर्शकांनी त्यांच्या शंकाचे समाधान केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे म्हणाल्या की, महिलांनी समतोल आहार घेणे आवश्यक आहे. उपवासामुळे अनेक स्त्रियांच्या आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे स्त्रियांमध्ये समतोल आहाराविषयी जागृकता होणे आवश्यक आहे. असे त्यांनी प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे आभार रा.से.यो. विभागाची स्वयंसेविका कु. मयुरी जाधव

हिने मानले या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अनंत मरकाळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी डॉ. दिलीप भिसे, प्रा. जगन्नाथ तत्तापुरे, प्रा. शैलेश जाधव, प्रा. करुणा देशमुख व प्रा. साखरे शरयु उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

9. **स्वच्छता अभियान :**

दि. 03 ऑक्टोंबर 2019 रोजीयशवंतराव चव्हाण महाविद्यालयात प्राचार्या डॉ. व्ही. जी. गुंडरे, यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजित भगत, डॉ. अनंत मरकाळे यांच्या सहकार्याने महाविद्यालय परिसर, स्वयंसेवकांनी स्वच्छ केला.

10. **सदभावना दिन :**

दि. 03 सप्टें, 2019 रोजी सदभावनादिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. व्ही. जी. गुंडरे यांनी राजीव गांधी यांच्या व्यक्तीमत्वावर प्रकाश टाकला व सदभावना दिनाचे अवचित्य सांगीतले कार्यक्रमधिकारी डॉ. इंद्रजित भगत यांनी उपस्थितांना सदभावना दिनाची शपथ दिली. याप्रसंगी व उपप्राचार्य डॉ. डी. आर. तांदळे, प्रा. अहिल्या बरुरे, प्रा. अरविंद घोडके, प्रा. अनंत मरकाळे व स्वयंसेवकाची उपस्थिती होती.

11. **साक्षरता दिन साजरा :**

दि. 08 सप्टें, 2019 राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आंतराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे या कार्यक्रमाच्या अध्यक्षा होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी त्या म्हणाल्या की, समाजात साक्षरतेचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे संचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. अनंत मरकाळे यांनी केले तर आभार डॉ. इंद्रजित भगत यांनी मांनले. याप्रसंगी डॉ. दिलीप भिसे, डॉ. रमेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.?

12. **गणेश विसर्जन निर्माल्य संकलन :**

दि. 13 सप्टें, 2019 राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गणेश विसर्जनानिमित्त गणेश विसर्जन स्थळावर जाऊन स्वयंसेवकांनी निर्माल्याचे संकलन केले. तसेच त्याठिकाणच्या परिसराची स्वच्छता केली. यासाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजित भगत यांनी मार्गदर्शन केले.

13. **रा.से.यो. दिन साजरा :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुवर्ण महोत्सवी स्थापना दिनानिमित्त 24 सप्टेंबर 2019 रोजी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध गजलकार डॉ. मुकुंद राजपंखे हे उपस्थित होते. तर या कार्यक्रमाच्या

अध्यक्षा प्राचार्य डॉ. वनमाला गुंडरे ह्या होत्या. तर यावेळी मंचावर उपप्राचार्य. प्रा. प्रताप जाधव उपस्थित होते. सर्वप्रथम पाहुण्याच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचा पुष्पगुच्छ व शाल देवून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनंत मरकाळे यांनी केले. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास हा सांगून, राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्देश सांगितले. यानंतर पोषण महा निमित्त घेतलेल्या आंतर महाविद्यालयीन भिंत्तीपत्रक स्पर्धेमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्वयःशिस्तीने स्वतःचे काम स्वतः करायला पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्याचे आयुष्य घडवते. राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांना विकासाची एक संधी आहे. विद्यार्थ्यांनी व्यक्त व्हायला शिकले पाहिजे. तसेच शेवटी त्यांनी आपली

"मला वाटले जे तुलाही कळू दे
तुझा गंध माझ्या घरी दरवळू दे
असो मी नसो मी मला खंत नाही
सुखाच्या घरी तु मला आढळु दे"
ही एक सुंदर कविता सादर केली.

शेवटी अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. वनमाला गुंडरे म्हणाल्या की, युवा शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली आहे. म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आलेली शिस्त विद्यार्थ्यांना वैयक्तीक व सामाजिक जीवनात महत्वाची आहे. या कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. इंद्रजीत भगत यांनी मानले. तर या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. मयुरी जाधव या विद्यार्थ्यीनीने केले. या कार्यक्रमाला योगेश्वरी महाविद्यालयतील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. नरसींगे व डॉ. आचार्य आपल्या स्वंयसेवकांसह उपस्थित होते. यावेळी डॉ. धर्मराज तांदुळजेकर, प्रा. देवकते व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुरेश घाडगे, राम सरवदे व शेख राजा यांनी सहकार्य केले.

**14. महात्मा गांधी व लालबहादुरशास्त्री जयंती :**

दि. 02 ऑक्टोंबर 2019 रोजी महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादुरशास्त्री जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलतांना त्या म्हणाल्या की, महात्मा गांधीजी यांचे जीवन चरित्र हे आजच्या तरुणासाठी प्रेरणादायी आहे. महात्मा गांधी यांच्या पासून प्रेरणा घेवून युवकांनी आपले कार्य करावे. याप्रसंगी विद्यार्थ्यांना तंबाखू मुक्तीची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. अनंत मरकाळे यांनी केले. तर आभार डॉ. इंद्रजित भगत यांनी मानले. महाविद्यालयातील प्राध्यापक व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**15. संविधान दिन साजरा :**

महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतीने 26 नोव्हें 2019 हा दिन संविधान दिन म्हणून साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे या होत्या. तसेच या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक ॲड. संदीप थोरात होते. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना ॲड. थोरात यांनी राज्य घटनेविषयी माहिती दिली. व आदर्श राज्य निर्मितीसाठी नागरीकांनी राज्यघटनेचे काटेकोर पालन करावे असे सांगीतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. इंद्रजित भगत व सूत्रसंचालन डॉ. अनंत मरकाळे यांनी केले तर आभार रा.से.यो. प्रतिनिधी अतुल निरडे यांनी मानले.

16. जागतिक एड्स दिन जनजागृती उपक्रम :

महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतीने 7 डिसेंबर 2019 रोजी एड्स जनजाग्रण कार्यक्रमांतर्गत स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयातील वैद्यकीय पथकाने स्वयंसेवकांची एड्स तपासणी केली. तसेच श्री. डॉ. राजकुमार गवळे यांनी एड्स रोगाविषयीचे समज व गैरसमज या विषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर एड्स रोगाविषयी माहिती देणाऱ्या पोस्टरचे प्रदर्शन करण्यात आले.

17. रस्ता सुरक्षा अभियान :

महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतीने 10 डिसेंबर 2019 रोजी रस्ता सुरक्षा अभियान रॅलीचे उद्घाटन प्राचार्या वनमाला गुंडरे यांनी केले. या रॅलीच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेविषयी माहिती देण्यात आली. या रॅलीमध्ये कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. इंद्रजित भगत व डॉ. अनंत मरकाळे व स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी होते.

**18. संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी :**

20 डिसेंबर 2019 रोजी संत गाडगेबाबा पुण्यतिथी रा.से.यो. विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली यानिमित्ताने महाविद्यालयात श्रमदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

**19. वार्षिक निवासी शिबीर :**

रा.से.यो. विभागाच्या वतीने दि. 06 जानेवारी 2020 ते 12 जानेवारी 2020 दरम्यान मौजे सेलूअंबा येथे वार्षिक निवासी शिबीर संपन्न झाले. शिबीराचे उद्घाटन मा. दिगांबरराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. रमेशराव आडसकर हे होते. तर शिबीराचा समारोह श्री. दत्ता आबा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या 7 दिवशीय शिबीरामध्ये गावातील तळ्याचे स्वच्छता व खोदकाम करण्यात आले. तसेच मुख्य रस्त्याचे दुरूस्तीकरण व स्वच्छता तसेच प्राथमीक शाळेमध्ये वृक्षरोपनासाठी 30 खड्डे खोदण्यात आले.

20.

**21. लोकशाही पंधरवाडा :**

रा. से. यो. विभागाच्या वतीने दि. 26 जानेवारी ते 10 फेब्रु. 2020 या दरम्यान महाविद्यालयात लोकशाही पंधरवाडा साजरा करण्यात आला. यानिमित्त दि. 10 फेब्रु 2020 डॉ. दिनकर तांदळे यांनी मार्गदर्शन केले. तसेच यानिमित्त निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, नगर पालिका अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजित भगत व डॉ. अनंत मरकाळे, यांनी केले.

**22. राष्ट्रीय एकता दिवस :**

रा. से. यो. विभागाच्या वतीने दि. 26 जानेवारी 2020 रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त राष्ट्रीय एकता दौड आयोजित करण्यात आली होती. तसेच राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त स्वयंसेवकांना एकतेविषयी शपथ देण्यात आली.

**23. प्लॅस्टक मुक्ती कार्यक्रम :**

रा. से. यो. विभागाच्या वतीने दि. 26 जानेवारी 2020 रोजी महाविद्यालयात सिंगल युज प्लॅस्टीक मुक्ती अभियानाअंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे होत्या या निमित्त त्यांनी मार्गदर्शन करतांना त्या म्हणाल्या की, प्लॅस्टीक निसर्गासाठी हानिकारक आहे. मानवाने कमीत कमी प्लॅस्टीकचा वापर करावा यानंतर सर्व उपस्थितांना प्लॅस्टीक मुक्तीची शपथ देण्यात आली.

कार्यक्रमाधिकारी                                                                 प्राचार्या




दि. 26 नोव्हेंबर 2019 रोजी महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतिने संविधान दिन साजरा करण्यात आला.



दि. 26 नोव्हेंबर 2019 रोजी महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतिने संविधान दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने उपस्थित मान्यवर व विद्यार्थी



दि. 01 डिसेंबर 2019 रोजी महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतिने एड्स दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्या. डॉ. वनमाला गुंडरे व अन्य मान्यवर.



दि. 01 डिसेंबर 2019 रोजी महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतिने एड्स दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने रांगोळी काढतांना विद्यार्थीनी व अन्य मान्यवर.




दि. 28.01.2020 रोजी मतदार जागृती अभियानानिमित्त पथनाट्य सादर करतांना रा.से.यो. विभागाचे स्वयंसेवक






दि. 02 ऑक्टोंबर 2019 रोजी महाविद्यालयात महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली त्याप्रसंगी उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. व्ही. जी. गुंडरे, उपप्राचार्य पी. के. जाधव व अन्य मान्यवर






राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापना दिवसानिमित्त महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना प्राचार्या डॉ. व्ही. जी. गुंडरे मॅडम व उपस्थित मान्वर आणि विद्यार्थी






एड्स जनजागृतीपर कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना डॉ. राजकुमार गवळे व उपस्थित मान्यवर




स्वयंसेवकांची एड्स रोगाची तपासणी करतांना वैद्यकीय पथक




गांधी जयंती निमित्त बालतांना स्वयंसेवक सुरज देशमुख व मंचावर उपस्थित मान्यवर




पोषण माह निमित्त आयोजित पोस्टर प्रदर्शण पाहतांना मान्यवर




पोषण माह निमित्त मार्गदर्शन करतांना डॉ. दहिरे व डॉ. अंकुशे






पुरग्रस्तांसाठी मदत फेरी





क्रांती दिनानिमित्त मार्गदर्शन करातांना प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे व डॉ. दिलीप भिसे





म्हाविद्यालय परिसरात स्वच्छता करतांना स्वयंसेवक



# पूरग्रस्तांसाठी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाची मदतफेरी



**अंबाजोगाई । वार्ताहर**

महापुरामुळे कोल्हापूर, सातारा व सांगली जिल्ह्यातील लोकांचे जनजीवन विस्कळीत झाले. हजारो कुटुंबे ही विस्कळीत झाली आहेत. अशा संकटाच्या परिस्थितीत त्यांना मदतीची गरज आहे. या पार्श्वभूमीवर मानवतेच्या भावनेतून या पूरग्रस्तांसाठी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.वनमाला गुंडरे यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.१८ ऑगस्ट २०१९ रोजी अंबाजोगाई शहरात मदतफेरी काढण्यात आली.

या मदत फेरीचे आयोजन

*पान २ वर ▶▶*

# पूरग्रस्तांसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाची मदतफेरी




अंबाजोगाई (प्रतिनिधी) महापुरामुळे कोल्हापुर, सातारा व सांगली जिल्ह्यातील लोकांचे जनजीवन विस्कळीत झाले. हजारो कुटुंबे ही विस्कळीत झाली आहेत. अशा संकटाच्या परिस्थितीत त्यांना मदतीची गरज आहे. या पार्श्वभूमीवर मानवतेच्या भावनेतून या पूरग्रस्तांसाठी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.वनमाला गुंडरे यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.१८ ऑगस्ट २०१९ रोजी अंबाजोगाई शहरात मदतफेरी काढण्यात आली. या मदत फेरीचे आयोजन राष्ट्रीय सेवा व योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. आय.आर.भगत, प्रा.अनंत मरकाळे यांनी केले होते. उपप्राचार्य के.डी.गाडे यांनी मार्गदर्शन केल्यानंतर स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी यशवंतराव चव्हाण चौक, मोंढा मार्केट, मिनाताई ठाकरे चौक, तथागत चौक, राजीव गांधी चौक या ठिकाणी फेरी काढुन लोकांकडून रू.१८,५६०/- (अक्षरी- अठरा हजार पाचशे साठ रू.) एवढा निधी गोळा केला. त्याच वेळी समाजातील काही दानशुर लोकांनी चिवडा, बिस्कीट पुडे व कपडे दान केले. मदत फेरीत मिळालेल्या सर्व

(पान दोनवर)

# लेकरांनो व्यक्त व्हा म्हणजे व्यक्तिमत्व घडेल-डॉ.मुकुंद राजपंखे

अंबाजोगाई (प्रतिनिधी) येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ.मुकूंद राजपंखे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्वयंशिस्तीने स्वतःचे काम स्वतः करायला पाहिजे.राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवते. राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांना विकासाची एक संधी आहे.विद्यार्थ्यांनी व्यक्त व्हायला शिकले पाहिजे तसेच शेवटी त्यानी आपली मला वाटले जे तुलाही कळू दे,तुझा गंध माझ्या घरी दरवळू दे,असो मी नसो मी खंत नाही. सुखाच्या घरी तु मला आढळु दे ही एक सुंदर कविता सादर केली.




शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुवर्ण महोत्सवी स्थापना दिनानिमित्त मंगळवार,दि.२४ सप्टेंबर २०१९ रोजी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणुन प्रसिद्ध गजलकार डॉ.मुकुंद राजपंखे हे तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ.वनमाला गुंडरे या होत्या. तर यावेळी विचारमंचावर उपप्राचार्य प्रा. प्रताप जाधव उपस्थित होते. सर्वप्रथम पाहुण्यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.त्यानंतर मान्यवरांचा पुष्पगुच्छ व शाल देवून सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.अनंत मरकाळे यांनी केले.त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास हा सांगुन राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्देश सांगितले.यानंतर पोषण माह निमित्त घेतलेल्या आंतर महाविद्यालयीन भित्तीपत्रक स्पर्धेमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्या डॉ.वनमाला गुंडरे म्हणाल्या की,युवा शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी

पान ५ वर

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात महास्वच्छता अभियान
## प्लॅस्टीक व तंबाखू मुक्तीची शपथ,एकता दौड विविध उपक्रम




अंबाजोगाई /प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५० वी जयंतीनिमित्त महास्वच्छता अभियान,प्लॅस्टीक मुक्ती अभियान,तंबाखू मुक्तीविषयी शपथ,एकता दौड असे अनेक उपक्रम राबविण्यात आले.

सर्वप्रथम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.वनमाला गुंडरे, उपप्राचार्य पी.के.जाधव, डॉ.मुकुंद राजपंखे,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमधिकारी डॉ.इंद्रजीत भगत व डॉ.अनंत मरकाळे यांनी महात्मा गांधी,दिवंगत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन केले.त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सुरज देशमख,पुजा सापते यांनी महात्मा गांधीच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.त्यांनतर उपप्राचार्य पी.के.जाधव यांनी महात्मा गांधी यांच्या अहिंसा व सत्याग्रह याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.शेवटी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्या डॉ.वनमाला गुंडरे म्हणाल्या की,महात्मा गांधीजी यांनी स्वच्छतेचे महत्व सांगितले.ते स्वच्छतेचे तत्व आपण आत्मसात केले पाहिजे. आपले घर व आपल्या कार्यालयाचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी आपण प्रयत्नशील असले पाहिजे.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.अनंत मरकाळे यांनी केले.तर उपस्थितांचे आभार डॉ.इंद्रजीत भगत यांनी मानले.या कार्यक्रमाला प्रा.केशव हंडीबाग,डॉ.मुकुंद राजपंखे, डॉ.रमेश शिंदे,प्रा.प्रशांत जगलाप,डॉ.वसंत गायकवाड, प्रा.चाऊस,प्रा.सुजाता पाटील, प्रा.हिरा नाडे,प्रा.देशमुख मॅडम व कार्यालयीन अधिक्षक लक्ष्मण वाघमारे उपस्थित होते.

यानंतर सर्व प्राध्यापक व स्वयंसेवकांनी तंबाखू मुक्तीविषयी शपथ घेतली.तसेच प्लॅस्टीक मुक्ती अभियानाची सुरवात करण्यासाठी प्लॅस्टीक न वापरण्याचा निर्धार केला. महाविद्यालयातील प्लॅस्टीक कचरा गोळा केला.राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर स्वच्छ केला.शेवटी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये प्राध्यापक व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात महास्वच्छता अभियान

[illegible]



[illegible]

पुढारी

# बाळासाठी दूध आरोग्यवर्धक

## जागृती शिबिरात डॉ. आर. टी. अंकुशे यांचे प्रतिपादन

**अंबाजोगाई, प्रतिनिधी :** मानवाच्या पोषणाची सुरुवात आईच्या गर्भात असल्यापासूनच होत असते, त्यामुळे गरोदर महिलांनी पोषक आहार घेतला पाहिजे, आईचे पहिले दूध नवजात शिशुला पाजले पाहिजे, हे दूध बाळासाठी आरोग्यवर्धक असल्याचे प्रतिपादन डॉ. आर. टी. अंकुशे यांनी केले.

ते यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १ ते ३० सप्टेंबर या कालावधीत पोषण माह आयोजित केला आहे. त्यामुळे महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून 'पोषण आहार जागृतीविषयक मार्गदर्शन शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. आर. टी. अंकुशे, डॉ. प्रशांत दहिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. इंद्रजित भगत यांनी केले. यावेळी पूरग्रस्तांना मदत निधी जमा केल्याबद्दल प्रातिनिधिक स्वरूपात पूजा सापते या विद्यार्थिनीचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. अंकुशे म्हणाले, बाळासाठी आईचे पहिले दूध महत्त्वाचे असून हे आरोग्यवर्धक आहे. डॉ. प्रशांत दहिरे यांनी बदलत्या जीवनशैलीमुळे होणाऱ्या आजारांची माहिती दिली. भाजीपाला, फळे आहारात घेण्याचा सल्लाही त्यांनी दिला.



अंबाजोगाई : शिबिरात डॉ. आर. टी. अंकुशे यांनी मार्गदर्शन केले.

My Beed Edition
8 Sep, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com